World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2017; 3(1): 103-104
www.wwjmrd.com
E-ISSN: 2454-6615

विश्वास गोरखनाथ वळवी
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

Correspondence:
विश्वास गोरखनाथ वळवी
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''जॉर्ज मुल्लर:- अनाथांचा पिता''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
The world today has made great progress in physical and scientific matters. Yet there is no dearth of poverty, disease, downtrodden and needy in the world. George Merler is one of them, raising thousands of orphans during his lifetime. George Muller was a true son of the faith. RSU Mirajkar* says, "George Muller was in a local congregation in England. He was also blessed by preachers. He looked after 10,000 orphans. He built five huge buildings, accommodating 2,000 children in one building. He didn't ask for a single one. Money for this huge service. He believed that it was God's will and command. He trusted his God with faith. During his 60 years of service, God gave him Rs. The pages are full and it tells how God answered 50,000 prayers."

**Keywords:** God, Scripture, Christ, Faith, Faithful, Believers, George, Müller, Orphans, Holy

**प्रस्तावना:**
आज जगाने भौतिक आणि वैज्ञानिक गोष्टीत अनेक प्रगती घडवून आणलेली आहे.पण तरीदेखील आज जगात गरिबी, रोगराई,दलित-पीडित आणि गरजवंत लोकांची कमी नाही.विधवा अनाथ आणि वाळीत टाकलेल्या लोकांची कमी नाही आणि त्यांना पाहणारे त्यांची सेवा करणारे त्यांना माणूस म्हणून जगण्याच्या अधिकार देणारे बोटावर मोजण्याइतके जॉर्ज मुल्लर हे त्यातील एक;आपल्या जीवितकाळात त्यांनी दहा हजार अनाथ मुलांना सहारा देऊन त्यांचे संगोपन केले. जॉर्ज मुल्लर हे खरे विश्वासपुत्र होते. र.सु.मिरजकर* म्हणतात "जॉर्ज मुल्लर इंग्लंडमध्ये एक स्थानिक मंडळीत होते. त्यांना सुवार्तिकांचेही कृपादान होते त्यांनी १०००० अनाथांचा प्रतिपाळ केला यासाठी एक इमारतीत २००० मुले राहू शकतील अशा पाच प्रचंड इमारती बांधल्या या सेवेला त्यांनी सुरुवात केली तेव्हा त्यांच्याजवळ फक्त ५० रुपये होते त्यांनी कधीही कोणाकडे या प्रचंड सेवेसाठी एक पैसा मागितला नाही.ही प्रभूची इच्छा व आज्ञा हाती अशी त्यांना खात्री होती ते विश्वासाने आपल्या प्रभुवरच अवलंबून राहिले.त्याच्या ६० वर्षाच्या सेवेच्या काळात देवाने अनाथकरिता त्यांना २० कोटी रुपये त्या स्वस्ताईच्या काळात पुरविले.देवाने दिलेल्या प्रार्थनांच्या उत्तराची नोंद ठेवण्यास त्यांना ३००० पृष्टे लागली व त्यात ५०००० प्रार्थनांची उत्तरे प्रभूने कशी दिली यांचा उल्लेख आहे."
जॉर्ज मुल्लर यांची उद्दीष्टे स्पष्ट होती.
१) पवित्रशास्त्रातील तत्वावर आधारित दिवसाची शाळा,शब्बाथ शाळा,प्रौढ शाळा ही केवळ विश्वासू चालवावीत व ते शिक्षन देणारे असावे:-जॉर्ज मुल्लर यांनी जी संस्था काढली त्या स्पष्ट म्हणतात देवाच्या ज्या व्यक्तीचे पाचारण केलेले आहे त्यालाच मंडळीत जबाबदारी देण्यात यावी
२) पवितशास्त्र त्याचे विभाग व संपूर्ण शास्त्र जास्तीत जास्त लोकांना वितरित करावे:-जॉर्ज मुल्लर यांनी ख्रिस्ताचा संदेश हा जनसामान्य माणसापर्यंत पोहचावा म्हणून पवित्रशास्त्र हे घरोघरी पोहचविण्याचे धडाळीचे कार्य केले.
३) पवित्रशास्त्र तत्वावर आणि जे प्रभूकडे मदतीची अपेक्षा करतात व जे प्रभूचे काम कोठेही करीत आहेत.अशा मिशनरी कार्यासाठी व सहकाऱ्यानां मदत करणे:- जगात अनेक मिशनरी संस्था आणि मिशनरी जॉर्ज मुल्लरचा काळात होत्या पण जे समर्पित आणि पचारणास योग्य संस्था आणि मिशनरी असतील त्यांनाच पवित्रशास्त्र आणि आर्थिक मदत करायची अशी खबरदारी जॉर्ज मुल्लर यांनी आपल्या सेवेच्या कार्यकाळात घेतली त्यामुळे त्यांची सेवा ही सर्वमान्य झाली.आपल्या संपूर्ण कार्यकाळात देवाशी जॉर्ज मुल्लर प्रामाणिक आणि विश्वासू राहिले.आपल्या सेवेत त्यांनी कधीही स्वतःची महिमा करून घेतली नाही,त्यांनी देवाला आणि देवाच्या महिमेला प्रथम स्थान दिले.ते खरे ख्रिस्ताचे विश्वासपुत्र होते.

जॉर्ज मुल्लर यांच्या जन्म जर्मनीत २७ सप्टेंबर १८०५ रोजी एका श्रीमंत कुटुंबात झाला.जॉर्ज मुल्लरचे वडील एक कलेक्टर असून सर्व सोयसुविधा त्यांच्या घरात होत्या.पण प्रभूने मुल्लरला आपल्या सेवेसाठी पाचारण केले.विश्वासपुत्र म्हणून मुल्लर पुढे ख्रिस्ती जगतात ओळखले जाऊ लागले.ब्रिस्टलच्या रस्त्यावर गरीब-अनाथ मुलांना पाहून,त्यांच्या आधारासाठी आणि उद्धारासाठी आपण काहीं तरी करावे,आणि ख्रीस्तासोबत त्यांना अभावशील गोष्ठी प्रदान कराव्या,हे दर्शन घेऊन जॉर्ज मुल्लर यांनी आपले सर्वस्व जीवन देवून टाकले.दहा हजार अनाथांचे वडील म्हणून ते पुढे प्रसिद्ध झाले. हेल्पिंग हॅन्डस मिशन इंडियाने जॉर्ज मुल्लरच्या पाऊलावर-पाऊल टाकून आज गरीब-अनाथ मुलांसाठी वेगवेगळ्या योजना राबवून ख्रिस्ताचा संदेश देत आहे.

**संदर्भसुची:-**

1. George Muller Iternal Light Tracts. septembar 2014, Nashik.